Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani


# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

(20 Sept. 2017) Volume I, Issue-I


On the Occasion of ICSSR SPONSORED
One Day National Conference On

# ROLE OF PANCHAYAT RAJ IN RURAL DEVELOPMENT IN INDIA


Organized by

Department of Public - Administration, Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai, Dist. Beed (M.S.)





**Editor in Chief**
**Mr. Arun Godam**

**Guest Editors**
**Principal Dr. Arun Dalve**
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai, Dist. Beed (MS)

**Assit. Prof. S.D. Dixit**
Head Dept. of Public Administration
Vasundhara College, Ghatnandur

**Assit. Prof. H.W. Jadhav**
Dept. of Public Administration
Vasundhara College, Ghatnandur


www.rjournals.co.in

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth (G)
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

Role of Panchayat Raj in Rural Development in India
CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol. I, Issue I, 20 Sept. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


| Sr. No. | Article Title | Author | Page no. |
|---|---|---|---|
| 1 | Women Empowerment Through Panchayati Raj Institutions | Dr. B. R. Katturwar. | 1 |
| 2 | Drinking water quality in rural India: Issues and approaches | Mr. Shaikh Mohmmad Hanif Ismailsab | 3 |
| 3 | Impact Of Jalyukta-Shivar Abhiyan: A Study Of Manjara River In Latur District | Dr. Shinde Prakash Raosaheb | 7 |
| 4 | Role of Panchyat Raj in Poverty Eradication | Dr. Vandana M. Mahure | 11 |
| 5 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी योजना-एक चिकित्सा | डॉ.पिंपळे बी.एस. , प्रा.दीक्षित एस.डी. | 15 |
| 6 | ई-पंचायतों से सशक्त होता पंचायतराज | प्रा.डॉ. बिरंगणे एस.एस. | 17 |
| 7 | ग्रामीण विकासाच्या संदर्भात ग्रामपंचायतीच्या कार्यक्षमतेचा अभ्यास-दिवाबत्तीच्या विशेष संदर्भात : मराठवाडा एक अध्ययन | प्रा.डॉ. गंगणे जीवन सुदामराव | 20 |
| 8 | पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामसभेचे महत्व | प्रा.अमोल उत्तमराव गंगणे | 25 |
| 9 | महिला नेतृत्व व महिला सक्षमीकरण | प्रा.डॉ.आकोलकर आशा दगडू | 28 |
| 10 | पंचायतराज महिला आरक्षण आणि महिला सबलीकरण | प्राचार्य, डॉ. अरुण दळवे | 31 |
| 11 | ग्रामीण जीवन आणि जलयुक्त शिवार | प्रा.डॉ.सुधाकर भालेराव | 34 |
| 12 | पंचायतराज व ग्राम विकास | प्रा.बिडवे टी.एस | 37 |
| 13 | पंचायत राज आणि महिला सक्षमीकरण | डॉ.चव्हाण संजय संदिपान | 40 |
| 14 | ग्रामीण विकासामध्ये ग्रामसभेची भूमीका | डॉ. दिपक एस. वाघमारे | 41 |
| 15 | ग्रामीण विकास आणि पंचायतराज व्यवस्था | प्रा.डॉ. जे.एस. ढवळे | 45 |
| 16 | रोल ऑफ पंचायरत राज इन रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया भारताच्या ग्रामीण विकासात पंचायत राजचे योगदान | डॉ. मंचक रंगनाथराव मोरे | 47 |
| 17 | पंचायतराज संस्था मधील महिला नेतृत्वाचा राजकीय अभ्यास | प्रा.डॉ.कदम एच.पी. प्रा.डहाळे सचिन | 50 |
| 18 | नेतृत्व विकासात पंचायतराजची भूमिका | डॉ. शंकर लेखणे | 53 |
| 19 | ग्रामीण नेतृत्व विकासात पंचायतराजची भूमिका | प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | 56 |
| 20 | ग्रामीण विकासात पंचायतराच्या कार्यक्षमतेची भूमिका | डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे | 60 |
| 21 | स्वच्छ भारत अभियानात पंचायतराजची भुमिका | प्रा. जाधव हेमराज वामनराव | 63 |
| 22 | जलयुक्त शिवार आणि ग्रामीण विकास | डॉ.जिजाबाई कांगणे | 65 |
| 23 | भारतातील ग्रामीण विकासात प्रशासनाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास. | डॉ. जोगदंड संजय पांडूरंग | 69 |
| 24 | ग्रामीण विकासासाठी रोजगार हमी योजना | डॉ.व्यंकट विळेगावे , डॉ. नागनाथ कळबंडे | 71 |
| 25 | पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामीण विकास : एक मुल्यमापन | सुनिता कांबळे, प्रा. संजय कांबळे | 74 |
| 26 | पंचायतराज व्यवस्थेचे अवलोकन | प्रा. डी.के. कटके | 78 |
| 27 | ग्रामीण स्वच्छता- आव्हाने आणि पुढील वाटचाल | डॉ.डी.के.खोकले | 80 |
| 28 | महिला सक्षमीकरणात पंचायतराजची भूमिका | डॉ.संतोष कुऱ्हे सहा.प्रा.आरडले एस.डी. | 83 |
| 29 | पंचायत राज व्यवस्था महिलांचा राजकीय सहभाग | डॉ. देशमुख विठ्ठल शंकरराव | 85 |
| 30 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विशेष संदर्भ | प्रा. डॉ. आमले एस. एस. | 87 |

Role of Panchayat Raj in Rural Development in India
CURRENT GLOBAL REVIEWER
(56)
www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol. I Issue I, 20 Sept. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# (19)
# ग्रामीण नेतृत्व विकासात पंचायतराजची भूमिका

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

---

ग्रामीण नेतृत्त्व विकसातून ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने १९५२ मध्ये समुदाय विकास कार्यक्रमाची सुरूवात झाली. परंतु या कार्यक्रमाला यश मिळाले नाही. या कार्यक्रमाच्या अपयशाची कारणे शोधण्यासाठी तसेच ग्रामीण विकासासाठी योग्य त्या उपायायोजना शोधण्यासाठी १६ जानेवारी १९५७ रोजी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. बलवंतराय मेहता समितीने आपल्या अहवालामध्ये लोहशाही विकेंद्रीकरण भर देत त्रिस्तरीय पंचायत राज संस्थेची निर्मिती करण्याची शिफारस केली. त्यानूसार केंद्रसरकाररने सर्व घटकराज्यांना आपल्या राज्यात पंचायतराज संस्थांची स्थापना करण्याच्या सूचना केल्या.

सर्वप्रथम राजस्थानमध्ये २ ऑक्टोंबर १९५९ मध्ये नागोर येथे तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरू यांच्या हस्ते पंचायतराज संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्रात बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या शिफारशीच्या आधारे जिल्हा परिषदा व पंचायतसमित्या अधिनियम १९६२ तयार करण्यात आला व १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज संस्था अस्तित्वात आली. भारतातील सर्वच राज्यांनी आपल्या सोयीनूसार पंचायतराज संस्थेचा अंगीकार केला. यातून ग्रामीण नेतृत्वाच्या विकासाला चालना मिळाली. १९९३ च्या ७३ व्या घटनादुरूस्ती अधिनियमाच्या माध्यमातून पंचायतराज संस्था बळकट करण्यात आल्या. त्याचबरोबर ग्रामीण नेत्वृत्वाच्या विकासाची विविध दालने उघडण्यात आली. समाजातील सर्व घटकांचा स्थानिक राजकारणातील सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी अनूसूचित जाती-जमातीसाठी आरक्षण देण्यात आले. त्याच बरोबर महिलांसाठी ३३% आरक्षण ठेवण्यात आले. २०११ च्या ११० व्या घटनादुरूस्ती नुसार महिलांना ५०% आरक्षण दिले. यातून समाजातील प्रत्येक स्तरावरील लोकांना राजकीय नेतृत्वाच्या विकासाची संधी प्राप्त झाली आहे.

- **संशोधन पध्दती :-**

प्रस्तूत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके व इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

- **शोधनिबंधाचे उद्देश :-**

१) ग्रामीण नेतृत्वाच्या विकासातील पंचायतराज संस्थेचे योगदान स्पष्ट करणे.
२) ग्रामीण नेतृत्व विकसासातील आडथळे स्पष्ट करणे.
३) ग्रामीण नेतृत्व विकासासाठी उपाय शोधणे.

- **गृहितकृत्ये :-**

१) केंद्र व राज्य स्तरावरील राजकीय नेत्यांचा पंचायतराज संस्थातील वाढता हस्तक्षेप ग्रामीण नेतृत्वाच्या विकासातील प्रमुख आडथळा आहे.
२) `नोट के बदले वोट` ही प्रथा ग्रामीण नेतृत्व विकासाला घातक ठरत आहे.

- **ग्रामीण नेतृत्वाच्या विकासातील पंचायतराज संस्थेचे योगदान :-**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतास सत्तेच्या विकेंद्रीकरणाची गरज भासली. कारण विस्तीर्ण भुप्रदेश अनेक जीवन जगण्याच्या पध्दती, अनेक संस्कृती अनेक वर्षापासून त्यांनी जपलेली विविधता अशा वातावरणात केंद्रस्थानी असलेल्या शासनाला स्थानिक प्रश्न पुर्णतः समजणार नाहीत व नसमजल्यामुळे ते एकाच पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न होईल. यामुळे प्रश्न कमी न होता वाढण्याची शक्यता अधिक असते. यावर उत्तम उपाय म्हणजे त्यांचा प्रश्न आहे, त्याला तो समजला आहे. अशांना सत्तेत सहभाग देणे, निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण होय. जसे केंद्रसरकार - राज्यसरकार - जिल्हापरिषद - पंचायत समिती व ग्रामपंचायत होय. अशा पायऱ्या आणि प्रत्येक पायरीवर बसणाऱ्यांना विशिष्ट अधिकार, ही व्यवस्था म्हणजेच सत्तेचे

Role of Panchayat Raj in Rural Development in India
CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in
Vol I Issue I, 20 Sept. 2017 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143
Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

विकेंद्रीकरण होय. या विकेंद्रीकरणामुळे अधिकारशाहीला आळा बसतो व सुयोग्य निर्णय प्रक्रियेद्वारे स्थानिक प्रशासन राबविले जाते. यातून ग्रामीण नेतृत्वाच्या विकासाला वाव मिळतो.

त्रिस्तरीय पंचायतराज संस्था ही ग्रामीण क्षेत्रासाठी कार्य करणारी राजकीय संघटना असुन या संघटनेच्या संचलनाची जबाबदारी ग्रामीण जनतेवर सोपविण्यात आली आहे. म्हणजेच या संस्थेतील प्रत्येक स्तरावरील प्रतिनिधी ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास असणे बंधनकारक आहे किंवा त्या उमेदवाराचे नाव संबंधित मतदार यादीत असावे लागते. पंचायतराज संस्था ही ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी निर्माण करण्यात आल्यामुळे या संस्थेच्या कारभारात ग्रामीण नेतृत्वाची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे आजही आपल्या देशातील एकूण लोकसंख्यापैकी ६५% पेक्षा अधिक लोक ग्रामीण भागात आहेत तेव्हा या ६५% लोकांचे नेतृत्व करण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावरील नेतृत्व विकसित होण्याची आवश्यकता असते. ते नेतृत्व विकसित होण्यासाठीची पाठशाला म्हणजे पंचायतराज संस्था आहेत.

भारताचे पहिले पंतप्रधान कै.पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९४८ साली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मंत्र्यांच्या पहिल्या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी काढलेले उद्गार या दृष्टीने महत्वाचे वाटतात. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या खऱ्या आधारशिला आहेत आणि असावयासच पाहिजेत. जोपर्यंत लोकशाही खालच्या स्तर मजबूत होत नाही तोपर्यंत घरच्या स्तरावरील लोकशाही सफल होत नाही.`` यासाठी लोकशाही शासनपध्दतीत ग्राम, खेडे, तालुका, जिल्हापातळीवर जनतेला राज्यकारभारात सहभागी करून घेण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक ठरते. ग्रामीण लोकांचा सर्वांगिण विकास झाला तरच देशाचा सर्वांगिण विकास होईल. ग्रामीण भागातून नेतृत्व विकसित झाले तर त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्याची संधी मिळेल आणि हे नेतृत्व ग्रामीण समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरेल. असे नेतृत्व विकसित करण्यासाठी पंचातराज संस्थांचे योगदान अधिक आहे. महाराष्ट्राचे कै. माजी गृहमंत्री आर.आर पाटील यांचे नेतृत्व उदयास आले ते पंचायतराज संस्थेतूनच. आज पंचायतराज संस्थामध्ये नेतृत्व करण्याची समान संधी प्राप्त झाली आहे. जिल्हापातळीवर अनेक महिला आपल्या नेतृत्वाची छाप पाडताना दिसून येत आहेत. काही महिला सरपंचांनी तर नेत्रदिपक कार्य केले आहे.

खालील तक्त्याच्या आधारे भारतात पंचायतराज संस्थेत सहभागी सदस्य, सरपंच, सभापती व जिल्हापरिषद अध्यक्ष या पदांची संख्या पाहिली असता ग्रामीण नेतृत्व विकासातील पंचायतराज संस्थेचे योगदान लक्षात येते.

➢ **भारतातील जि.प.पंचायत समिती व ग्रामपंचायतीची संख्या**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषदांची संख्या | ४७४ |
| २ | पंचायत समित्या | ५१०० |
| ३ | ग्रामपंचायतीची संख्या | २,२५,००० |
| | एकूण | २,३०,५७४ |

➢ **सदस्य संख्या**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | ४७५० |
| २ | पंचायत समिती | ५१,००० |
| ३ | ग्रामपंचायतीची संख्या | २२,५०,००० |
| | एकूण | २३,०५,७५० |

वरील तक्त्याचे निरिक्षण केले असता असे निदर्शनास येते की पंचायतराज संस्थामध्ये २३,०५,७५० ग्रामीण लोकांना ग्रामीण राजकारणात सक्रीयपणे सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे. ७३ व्या घटनादुरूस्ती अधिनियमानुसार सर्वसामान्य जनतेला राजकारणात सहभागी होता येत आहे. तसेच ५०% महिलांचा सहभाग ग्रामीण राजकारणात दिसून येत आहेत. यामुळे नेतृत्व विकासाला चालना मिळू शकते. त्याच बरोबर २,३०,५७४ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था असल्यामुळे त्या प्रमाणात नेतृत्व करण्याची संधी ग्रामीण लोकांना प्राप्त होत आहे. यामुन ग्रामीण नेतृत्वाचा विकास होतो. यापैकी १,१५,२८७ महिलांना नेतृत्वाची संधी प्राप्त होते व महिलांच्या नेतृत्वाचा विकास होऊ शकतो. स्थानिक पातळीवरील नेतृत्वाच्या अनुभवातून हेच नेते राज्य व राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व करण्याच्या दृष्टीने तयार होऊ शकतात.

➢ **ग्रामीण नेतृत्व विकासातील अडथळे :-**

कोणत्याही व्यवस्थेचे यश किंवा अपयश हे त्या व्यवस्थेच्या नेतृत्वावर अवलंबून असते. पंचायतराज व्यवस्था, अधिक मजबूत, परिणामकारक आणि कार्यक्षम करण्याकरिता स्वातंत्र्यानंतर ५० ते ६० समित्या गठित करण्यात आल्या. या समित्यांनी अनेक शिफारशी केल्या. त्यातील बऱ्याच शिफारशींची अमंलबजावणीसुध्दा करण्यात आली. परंतु पंचायतराज व्यवस्थेच्या

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

Role of Panchayat Raj in Rural Development in India
CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143
Vol 1 Issue I, 20 Sept. 2017



एकूण कामकाजात फारसा बदल आणि सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे या सर्व समित्यांनी पंचायतराज व्यवस्थेच्या ढाच्यावर, रचनेवर उत्पन्नाचे साधनांवर आणि कामकाज पध्दतीवर अधिक भर दिला. या समित्यांनी पंचायतराज व्यवस्थेच्या `नेत्वृत्वाबाबत` फारसा विचार केला नाही.

ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासाठी पंचायतराज व्यवस्थेत गरज आहे ती निस्वार्थी, लोकशाहीवर विश्वास, सामाजिक बांधिलकी आणि व्यापक सामाजिक हिताची जाण असणाऱ्या जनसामान्य नेतृत्वाची मात्र पंचायज राज व्यवस्थेत असे नेतृत्व निर्माण होताना दिसून येत नाही. त्यातील प्रमुख अडथळे खालील प्रमाणे दिसून येतात.

**१) राज्य व राष्ट्रीय नेत्यांचा वाढता हस्तक्षेप :-**

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात त्या क्षेत्रातील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व करणाऱ्या नेत्यांद्वारे हस्तक्षेप केला जातो. यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेत कार्य करणाऱ्या उमेदवारांना योग्य निर्णय घेता येत नाही. त्यांच्यावर येणाऱ्या दबावामुळे त्यांना स्वविवेकाचा वापर करता येत नाही. परिणामी ग्रामीण नेतृत्व ग्रामीण जनतेच्या मनावर खऱ्या अर्थाने छाप पाडू शकत नाही.

**२) पक्षीय राजकारणाचा प्रभाव :-**

पंचायतराज संस्थामधील नेतृत्वावर पक्षीय राजकारणाचा प्रभाव पडतो. संस्थेत कार्य करीत असतांना प्रत्येक निर्णय घेण्यापुर्वी पक्षहिताचा विचार करावा लागतो. पक्षाच्या विरोधात संस्थेच्या विकासाला आथवा जनहिताचा विचार करून निर्णय घेतला असता पक्षाकडून कार्यवाही होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेकवेळ ग्रामीण नेतृत्व आपली छाप पाडू शकत नाही. यामुळे त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास होऊ शकत नाही.

**३) ग्रामीण जनतेचे अज्ञान :-**

ग्रामीण अर्थव्यवस्था ही कृषी व्यवसायावर आधारित आहे. त्यामुळे सामान्य जनता ही कायम शेतीत राबणारी असते. त्यांना ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्था आपल्यासाठी काय करू कशतात ? त्यांची जबाबदारी काय आहे ? या संस्थांच्या माध्यमातून कोणती कामे केली जातात ? याविषयी कोणतीही माहिती नसते. एवढेच नव्हे तर ग्रामपंचायत सदस्यांनाही काही महत्वाच्या योजना कशा राबवायच्या याविषयीचे ज्ञान नसते. अशा वेळी आपण निवडून दिलेल्या लोकाकडून त्यांना आपेक्षाही नसतात. यामुळे निवडून देताना नेत्याचे मूल्यमापन करण्याची क्षमता बहुतांश मतदारामध्ये नसते परिणामी योग्य नेतृत्वास वाव मिळत नाही.

**४) जाती व धर्माचा प्रभाव :-**

भारतीय राजकारणावर जाती व धर्माचा प्रभाव आहे. तो पंचायतराज संस्थेतही दिसून येतो. निवडणूकीच्या वेळी उमदेवार कोण आहे ? त्याची योग्यता काय आहे ? याचा विचार केला जात नाही. तर तो कोणत्या जातीचा व धर्माचा आहे ? कोणत्या पक्षाचा आहे ? याचा विचार केला जातो. यामुळे निस्वार्थी, प्रामाणिक व जनहिताची जान असलेल्या व्यक्तीला ग्रामीण नेतृत्व करण्याची संधी प्राप्त होत नाही.

**५) निवडणूकीमधील वाढता भ्रष्टाचार :-**

पंचायतराज संस्थामधील निवडणूकामध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहे हे सर्वश्रुत आहे. पक्षाकडून दिले जाणारे टिकीटही उमेदवाराची आर्थिक क्षमता पाहूण दिले जाते नंतर त्याची सामाजिक प्रतिष्ठा विचारात घेतली जाते. पंचायतराज संस्थाच्या निवडणूका म्हणजे जनतेसाठी एक उत्सवच ठरतो. असे वातावरण पाहावयास मिळते. निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवार मतदारांना आश्वासनं बरोबरच पैशाचेही वाटप करीत असतात. यामुळे सामान्य जनता पैशाला महत्व देते आणि अयोग्य व्यक्तीला मत देते. यामुळे निष्ठावन समाजसेवेची इच्छा व प्रामाणिक असलेल्या व्यक्तींना नेतृत्वाची संधी मिळत नाही. यातूनच आपल्याकडे सहजच बोलले जाते `शाहण्याने राजकारणात जाऊ नये.` ही बाब ग्रामीण नेतृत्वाच्या विकासाच्या दृष्टीने फार घातक ठरते.

सध्याची राजकीय व्यवस्था अनेक अवगुणांनी ग्रासलेली आहे. त्यामुळे उत्कृष्ट नेतृत्वाचा विकास होणे अभावानेच पाहावयास मिळते.

➢ **ग्रामीण नेतृत्वाच्या विकासाठी उपाययोजना :-**

१) ग्रमीण नेतृत्वाच्या विकासासाठी प्रथम ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती घडवून आणणे गरजेचे आहे.
२) राष्ट्रीय व राज्य स्तरावरील नेत्यंच्या हस्तक्षेपावर नियंत्रण ठेवले पाहिजे.
३) ग्रामीण क्षेत्रात पक्षीय राजकारणाचा प्रभाव कमी केला पाहिजे.

Role of Panchayat Raj in Rural Development in India
CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in
Vol 1 Issue 1 20 Sept. 2017 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist Parbhani

४) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्यघटनेने दिलेले सर्व अधिकार व कार्य करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे.

५) राळेगणसिध्दी, हिवरे बाजार, पाटोदा या गावांच्या विकासाची यशोगाथा गावकऱ्यांना सांगितली पाहिजे. यातून गावात सामाजिक नेतृत्व निर्माण होऊन उत्कृष्ट राजकीय नेतृत्व उदयास येण्यास मदत होईल.

६) महिला पदाधिकाऱ्यांना स्वविवेकानूसार निर्णय घेण्यासाठी योग्य वातावरण निर्माण झाले पाहिजे. आज देशाची संरक्षण मंत्री व परराष्ट्र मंत्री पदाची जबाबदारी महिला सांभाळत असतांना, ग्रामीण संस्थामध्ये महिलांना निर्णय घेता आला पाहिजे.

**निष्कर्ष :-**

पंचायतराज संस्था या बलवंतराय मेहता समितीच्या लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्याच्या शिफारशीमुळे अस्तित्वात आल्या. आज भारतात बहूतांश लोक पंचायतराज संस्थाच्या राजकीय प्रवाहात आल्याचे दिसते. मात्र या लोकांचा पंचायतराज संस्थातील सक्रीय सहभाग मोठ्या प्रमाणात वाढणे गरजेचे आहे. यामुळे ग्रामीण नेतृत्वाच्या विकासा बरोबरच ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला गती प्राप्त होऊ शकते. बचतगटात कार्य करणाऱ्या महिलांना पंचायतराज संस्थेत कार्य करण्याची संधी मिळाली असता त्यांनी स्वनिर्णयातून आपल्या गावात योजना राबविल्याचे उदाहरणे दिसून येत आहेत. ग्रामीण क्षेत्राच्या व ग्रामीण नेतृत्वाच्या विकासासाठी आवश्यकता आहे ती वरिष्ठ पातळीवरील राज्यकर्त्यांनी त्यांना स्वातंत्र्य देण्याची, पंचायतराज संस्थांना त्यांच्या क्षेत्रातील विषयांवर निर्णय घेण्याचे अधिकार प्राप्त झाले पाहिजेत.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१) प्राचार्य डॉ व्ही.एल.एरंडे संपादित - ग्रामीण विकासात स्थानिक स्वयंशासनातील नेतृत्वाची भूमिका व योगदान, मैत्री प्रकाशन लातूर, १० जानेवारी २०१५

२) प्रा.गोविंद यमलवाड - स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन नांदेड २००१

३) प्रा.बी.बी.पाटील - लोकप्रशासन, फडके प्रकाशन कोल्हापूर, सप्टेंबर २००५

४) के.सागर व प्रा.व्ही.बी.पाटील - मानव संसाधन विकास, के सागर पब्लिकेशन पुणे २०१२

५) डॉ प्रकाश पवार - सार्वजनिक धोरण - संकल्पना सिध्दांत आणि भारतीय सार्वजनिक धोरणाचा आढावा, प्रतिमा प्रकाशन, पुणे. २०१०

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani